# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.५/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक – ०६/१२/२०१४

**आदेश**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १०-अ (४)
२. मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ नियम ८ (१)
३. राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.५, दि.२९/११/२०१४ चे निवडणूक कार्यक्रमासंबंधीचे पत्र.

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षन, संचालन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. आणि ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया न्यायिक, स्वच्छ, मुक्त व पारदर्शी पध्दतीने पार पाडणे हाच मुख्य संविधानिक हेतू असल्याबाबत, मा. सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा विषद केलेले आहे.

आणि हा संविधानिक हेतू साध्य करण्याकरीता, ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीसंदर्भात नामनिर्देशनपत्र भरण्यासह सर्व टप्प्यांत मानवी हस्तक्षेपामुळे (Manipulation) होणाऱ्या त्रुटींचे निरसन करून सदर प्रक्रिया सुलभ तसेच पूर्णत: पारदर्शक करण्याच्या दृष्टीने संपर्ण निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण (Online Computerisation) करणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत झाले आहे.

आणि ज्याअर्थी, आतापर्यंत झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांच्याबाबतीत असा अनुभव आला आहे की, सदर ग्रामपंचायत निवडणुकीचे काम मोठया प्रमाणात असल्याने त्याची माहिती संकलीत होणे अवघड होते, तसेच विविध टप्प्यावरील विविध अहवाल पाठविण्यासाठी बराच वेळ वाया जातो. तसेच माहिती वेळेत न मिळाल्याने महत्वाचे तात्कालीक निर्णय घेण्यास उशीर होतो. हे सर्व टाळण्यासाठी ग्रामपंचायत निवडणुकीचे काम मुदतीत व कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण (Online Computerization) करणे गरजेचे आहे, असे आयोगाचे मत आहे.

आणि **ज्याअर्थी,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८मधील कलम १०-अ(४)मधील तरतुदीनुसार उक्त अधिनियम/नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आयोगाला न्याय्य व मुक्त निवडणूक होण्याच्या दृष्टीने सदर नियमाच्या तरतुदीशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश काढता येण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

आणि ज्याअर्थी, आयोगावर ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच पोट निवडणुकीसाठी मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ नियम ८ (१) अनुसार नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवशी व नियम ७ अन्वये नेमलेल्या वेळेच्या दरम्यान प्रत्येक उमेदवाराने नमुना-'अ' मध्ये लेखी अर्ज करून त्यावर सही केली करून स्वत: जातीने किंवा लेखी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत निवडणूक अधिकाऱ्यास नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, आयोगाने संगणकीकरण केल्याने उक्त नियम ८ (१) मधील तरतुदीमुळे, इच्छूक उमेदवारांमध्ये अगर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, याकरीता योग्य तरतूद / स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** उक्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग यासंदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे,

**अ)** माहे जानेवारी ते एप्रिल २०१५ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच रिक्त पदांसाठीच्या पोट निवडणुकांसाठी सर्व ठिकाणी उमेदवाराने; आयोगाने विकसित केलेल्या आज्ञावलीनुसार (Software) विहित मुदतीत नामनिर्देशनपत्र ऑनलाईन भरुन, त्या नामनिर्देशन पत्राची प्रिंटआऊट निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या समक्ष सही करुन त्यांच्याकडे सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन नामनिर्देशनपत्र इच्छूक उमेदवार स्वत: किंवा संग्राम कक्ष व ई-सेवा केंद्रांमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या सेवेचा लाभ घेऊन किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे मदत कक्षाचा लाभ घेऊन ऑनलाईन नामनिर्देशनपत्र भरून सादर करू शकेल.

तथापि, ज्या क्षेत्रामध्ये इंटरनेट सुविधेची अडचण असल्यामुळे उपलब्ध तिन्ही पर्यायामधून इच्छूक उमेदवार नामनिर्देशनपत्र भरू शकत नसेल अशा ठिकाणी सदर इच्छूक उमेदवार हाती भरलेले लेखी नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करील व अशारितीने प्राप्त झालेल्या सर्व लेखी अर्जांची संगणकीकृत माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल.

तसेच जे इच्छूक उमेदवार नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या अंतिम वेळेआधी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष हजर असतील, तर अशा उमेदवारांचे लेखी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी स्विकारु शकतील. तथापि, अशा सर्व लेखी अर्जांची संगणकीकरणामध्ये माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची असेल.

**ब)** तसेच नियम ८ (१) मधील तरतुद 'प्रत्येक उमेदवाराने नमुना-'अ' मध्ये लेखी अर्ज करून त्यावर सही...', या करीता संगणक प्रणालीमध्ये माहिती भरून प्रिंट (छपाई) केलेले नामनिर्देशनपत्र हे उमेदवाराने नमुना-अ मध्ये सादर केलेला लेखी अर्ज म्हणून गणण्यात यावे; व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ते स्विकारावे.

यासंदर्भातील तांत्रिक बाबींबाबत आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार,

सही /-
पूनम शिरसोळकर
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र